अपील अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपिल क्र. १२/२०१९
जा.क्र उआ (सा.प्र.)/२१८३ दि. ३१/०७/२०१९

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/१२/२०१९

**डॉ. प्रशांत चौधरी**
चौधरी डायग्नोस्टिक सेंटर,
औंध परिहार चौकाजवळ,
पुणे ४११००७

------------------ अपिलार्थी

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,**
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल**

डॉ. प्रशांत चौधरी रा. चौधरी डायग्नोस्टिक सेंटर, औंध परिहार चौकाजवळ, पुणे ४११००७ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांचेकडे दि. २९.०४.२०१९ रोजी अर्ज करून "जाहिराती, नॉन क्रिमीलेअर सर्टिफिकेट, नियुक्तीची आज्ञापत्रे आणि ओ.बी.सी. उमेदवाराचे नियुक्तीनंतर पुणे महानगरपालिका ने नॉन क्रिमीलेअर सर्टिफिकेट स्वीकारण्यात आले असेल त्याबाबत ई." माहिती मागितलेली होती.

अपिलार्थी यांचे मुळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा. क्र. जमाअ/आस्था/१२३९ दि. २३.०५.२०१९ अन्वये अर्जास उत्तर दिलेले आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| २९.०४.२०१९ | २९.०४.२०१९ | २८.०५.२०१९ | २३.०५.२०१९ | - |

अपिलार्थी यांनी "Incomplete / Misleading information received" असे नमूद करून अपील क्र. १२/२०१९ चा अपील अर्ज दि. २८.०६.२०१९ रोजी दाखल केलेला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| २८.०६.२०१९ | २८.०६.२०१९ | २१.०६.२०१९ | नाही | नाही |

सदर प्रकरणी दि. १६.०७.२०१९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी डॉ. **प्रशांत चौधरी** रा. चौधरी डायग्नोस्टिक सेंटर, औंध परिहार चौकाजवळ, पुणे ४११००७ हे उपस्थित होते. श्री चेतन कबाडे **जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**, आस्थापना विभाग, पुणे मनपा हे उपस्थित होते.

### विवेचन

अपिलार्थी डॉ. **प्रशांत चौधरी** रा. चौधरी डायग्नोस्टिक सेंटर, औंध परिहार चौकाजवळ, पुणे ४११००७ यांनी अपूर्ण माहिती मिळाली असे प्रतिपादन केले तर श्री चेतन कबाडे **जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**, आस्थापना विभाग, पुणे मनपा यांनी जा. क्र. जमाअ/आस्था/१२३९ दि. २३.०५.२०१९ अन्वये अर्जास उत्तर दिलेले आहे असे प्रतिपादन केले.

## आदेश

अपिलार्थी श्री डॉ. **प्रशांत चौधरी** रा. चौधरी डायग्नोस्टिक सेंटर, औंध परिहार चौकाजवळ, पुणे ४११००७ यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. **जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**, आस्थापना विभाग, पुणे मनपा यांनी अपिलार्थी श्री डॉ. **प्रशांत चौधरी** यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील मूळ अर्जातील माहिती ३० दिवसात संबंधित विभागांकडून प्राप्त करून घेऊन अपिलार्थी यांना विनामोबदला उपलब्ध करून द्यावी. अपील क्र. १२/२०१९ निकाली काढण्यात येत आहे.

**(अनिल मुळे)**
अपिलीय प्राधिकारी
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका